लोकमत ता.नं.२.

# बाबरीवरून पुन्हा खोदकाम

## चंद्रकांत पाटील यांच्या वक्तव्यावरून शिवसेना, मनसे आक्रमक

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** अयोध्येतील बाबरी मशीद पाडली, तेव्हा बाळासाहेब ठाकरे तिथे गेले होते की शिवसेना तिथे गेली होती? कारसेवक हे हिंदू होते. ते बजरंग दलाच्या नेतृत्वाखाली गेले होते. ज्यांनी बाबरी पाडली, ते कदापि शिवसैनिक नव्हते, असे विधान करून वादाची राळ उडवून देणारे मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या विधानावरून राजकीय- आरोप प्रत्यारोपांची राळ उडाली. गोमूत्रधारी चंद्रकांत पाटील हे बाबरीच्या आठवणींच्या खंदकातून बाहेर पडले. जेव्हा बाबरी पडली, तेव्हा हे सगळे 'उंदीर बिळा'त लपले होते, अशा शब्दांत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांनी संताप व्यक्त केला. मनसेनेही ट्वीट करत पाटील यांच्या वक्तव्याबाबत नाराजी व्यक्त केली. जोरदार टीका सुरू झाल्याने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पाटील यांना स्पष्टीकरण देण्यास सांगितले. त्यानंतर पाटील यांनी बाजू मांडत ते वक्तव्य बाळासाहेबांबाबत नसून संजय राऊत यांच्याबद्दल होते, अशी सारवासारव केली. बाळासाहेब ठाकरेंमुळे मुंबईत हिंदू जिवंत आहेत. बाबरी पडली, तेव्हा तेथे शिवसैनिक होतेच, पण भाजप किंवा शिवसेना पक्ष म्हणून ती पाडली गेली नाही, अशी भूमिकाही त्यांनी मांडली.

शिवसेना आणि बाळासाहेब ठाकरे यांच्याविषयीच्या पाटील यांच्या वक्तव्यानंतर पत्रकार परिषद घेत उद्धव ठाकरे, यांनी बाळासाहेबांचा अपमान करणाऱ्या चंद्रकांत पाटील यांचा मुख्यमंत्र्यांनी राजीनामा घ्यावा, नाहीतर स्वत: राजीनामा द्यावा, अशी मागणी केली.

उद्धव ठाकरे म्हणाले, बाबरी पाडली त्यावेळी भाजपचे तत्कालीन उपाध्यक्ष सुंदरसिंह भंडारी यांनी जाहीर केले होते, की बाबरी पाडण्यामध्ये भाजप वगैरे कोणी नाही. हे काम शिवसेनेने केले असेल. तेव्हा बाळासाहेबांनी नपुंसक नेतृत्व म्हणून चीड व्यक्त केली होती. त्यावेळी लालकृष्ण अडवाणी यांनी दिलेल्या मुलाखती पाहाव्यात.

बाबरीबाबत बाळासाहेबांना फोन आला तेव्हा ते बोलले होते, "माझ्या शिवसैनिकांनी पाडली असेल तर मला अभिमान आहे." तेव्हा आताच्या पंतप्रधानांचे नाव कुठेही नव्हते, असे सांगताना ठाकरे यांनी फडणवीसांवरही टीका केली. आता कोणी त्या वयात शाळेच्या सहलीला गेले असतील आणि सांगत असतील आमच्या आजूबाजूने गोळ्या गेल्या. कोणी म्हणत असतील, आम्ही तुरुंगात होतो, मग इतकी वर्षे गप्प का होतात? असा सवाल त्यांनी केला. त्यानंतर दंगली झाल्या त्यावेळी आमची सत्ता नव्हती, तरीही आम्ही मुंबई वाचवली. शिवसैनिकांनी काही दर्ग्यांनाही संरक्षण दिले, याकडे त्यांनी लक्ष वेधले.

### मनसेकडून व्हिडीओचा दाखला

- मनसेच्या ट्वीटमध्ये व्हिडीओ असून बाबरी पाडल्यानंतर बाळासाहेबांनी केलेल्या वक्तव्याची आठवण राज ठाकरे यांनी करून दिली.
- बाबरीचा विध्वंस झाल्यानंतर उसळलेल्या धार्मिक उन्मादात जनतेसाठी अभेद्य ढाल बनलेल्या वंदनीय बाळासाहेब ठाकरेंच्या प्रामाणिकपणावर, त्यांच्या शौर्यावर, धैर्यावर प्रश्नचिन्ह उभे करणाऱ्यांनी हा प्रसंग ऐकावा, असे त्यात म्हटले आहे.

### बाळासाहेबांचे महत्त्व कमी करण्याची चाल




ही भाजपची चाल आहे. हळूहळू त्यांना बाळासाहेबांचे महत्त्व लोकांच्या मनातून कमी करायचं आहे. मनावर ओझं ठेवून जो दगड बसवलेला आहे, तो आता जड व्हायला लागलाय, अशी परिस्थिती भाजपच्या इथल्या नेतृत्वाची आहे. बाळासाहेबांचा अपमान करताहेत, त्यांचे तळवे किती दिवस चाटणार आहात. आता कुणाला जोडे मारणार आहात, की स्वत: च स्वत:ला मारणार आहात? बाळासाहेब आणि शिवसेनेचे नाव घेण्याचा तुम्हाला अधिकार नाही, अशी टीकाही उद्धव यांनी केली.

### बाबरी पाडली तेव्हा उद्धव ठाकरे कुठे होते? : शिंदे



- चंद्रकांत पाटील यांच्याशी आपण बोललो आहोत असे सांगताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बाबरी पाडली तेव्हा आताचे माजी मुख्यमंत्री कुठे होते? त्यांना यावर बोलण्याचा अधिकार तरी आहे का, असा सवाल केला. बाबरी आंदोलनात कोणताही पक्ष नव्हता. सर्वच जण रामभक्त म्हणून सहभागी झाले होते.
- बाळासाहेब ठाकरे यांनी घेतलेली भूमिका जगजाहीर आहे. 'गर्व से कहो, हम हिंदू हैं', हा नारा बाळासाहेब ठाकरेंनीच दिला होता. बाबरी पाडल्यानंतर मुंबईत दंगल उसळली तेव्हा मुंबईचे रक्षण हे बाळासाहेबांनीच केले होते.

बाबरी पाडल्यानंतर बाळासाहेबांनीच परखड भूमिका घेत याचे समर्थन केले होते. तेव्हा राम मंदिराला ज्यांनी विरोध केला त्यांच्यासोबत जे आता सत्तेत सहभागी झाले आहेत, त्यांना आता बाबरीवर बोलण्याचा काय अधिकार आहे? अयोध्येत राम मंदिर बनावे हे बाळासाहेबांचे स्वप्न होते. हे स्वप्न नरेंद्र मोदींनी पूर्ण केले, असे ते पुढे म्हणाले.



### बाळासाहेबांबाबत श्रद्धा : पाटील



बाळासाहेबांबाबत माझ्या मनात श्रद्धा आहे. त्यांच्या अनादराचे पाप करणार नाही. बाळासाहेब ठाकरेंमुळे मुंबईतील हिंदू जिवंत आहेत. उद्धव ठाकरे यांच्या विधानावर मी टिप्पणी करणार नाही, फोन करून त्यांच्याशी बोलेन. मुख्यमंत्र्यांचा मला फोन आला होता, त्यांनी स्पष्टीकरण करण्यास सांगितल्याचे ते म्हणाले.

Scanned with CamScanner

लोकसत्ता पृ.पा.१.

# शहरात पाच महिन्यांनंतर करोनाचा बळी

## एका दिवसात १२ रुग्णांची नोंद

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** वसई, विरार शहरात करोनाची भीषणता वाढत आहे. मंगळवारी वसईतील एका रुग्णाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. तब्बल पाच महिन्यांनी वसईत करोना रुग्णाच्या मृत्यूची नोंद झाली आहे.

करोनाची लाट ओसरल्यानंतर सारं काही आलबेल झालं होतं. मागील वर्षी ८ डिसेंबर २०२२ पासून ९ फेब्रुवारी २०२३ पर्यंत एकही करोना रुग्ण नव्हता, परंतु फेब्रुवारी महिन्यांपासून शहरात करोना रुग्ण आढळू लागले आहे. सुरुवातीला करोना रुग्णांची संख्या कमी म्हणजे एक किंवा दोन एवढी असायची, परंतु मार्चअखेरीपासून करोना रुग्णांच्या संख्येत मोठी वाढ झाली आहे. मंगळवारी शहरात तब्बल १२ रुग्ण आढळले आहे. त्यातच मुंबईच्या जेजे रुग्णालयात उपचार घेत असलेल्या ६९ वर्षीय रुग्णाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. २०२३ या वर्षातील हा पहिला करोना बळी आहे. तर मागील ५ महिन्यांनंतर प्रथमच करोना बळीची नोंद झाली आहे. २८ ऑक्टोबर २०२२ रोजी करोनाचा शेवटचा बळी गेला, त्यानंतर मंगळवारी करोना रुग्णाचा मृत्यू झाला. या रुग्णाला श्वसनाचा विकार होता. करोनाची लागण झाल्याने त्याची प्रकृती गंभीर झाली होती. त्याच्यावर मुंबईच्या जेजे रुग्णालयात उपचार सुरू होते. त्यावेळी त्याचा मृत्यू झाला अशी माहिती पालिकेच्या मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. भक्ती चौधरी यांनी दिली. त्यामुळे करोना मृत्यूमुळे नागरिकांनी घाबरून जाऊ नये असे त्यांनी सांगितले. करोनाचे जे रुग्ण आढळत आहेत त्यांना सौम्य लक्षणे असून नागरिकांनी मुखपट्टी वापरून काळजी घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले आहे. सध्या वसई विरार शहरात करोनाचे ४१ सक्रिय रुग्ण आहेत.

पुढारी पा.नं.३.

# मोटरसायकल चोरी करणाऱ्या दोघांना अटक, ५ मोटारसायकली जप्त

**मिरारोड** - नवघर पोलीस ठाणे हद्दीमध्ये मोटारसायकल चोरी करणाऱ्या दोघांना नवघर पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाने अटक करून त्यांच्याकडून ५ मोटारसायकल जप्त केल्या आहेत. तर त्यांनी केलेले ४ गुन्हे उघडकीस आणले आहेत. नवघर पोलीस ठाणे हद्दीतील सत्री महल, नवघर रोड, भाईंदर पूर्व येथे राहणारे शामलाल बैजनाथ गुप्ता यांनी त्यांची मोटारसायकल क्र. चक-०४ क्ष्व्-९७०७ हि ६ एप्रिल रोजी रात्री साई आराधना बिल्डींग समोर, जैसल पार्क, भाईंदर पूर्व येथे उभी करून ठेवली होती.दुसऱ्या दिवशी सकाळी त्यांनी उभी करून ठेवलेली मोटार सायकल घेण्यासाठी तेथे गेले असता त्यांची मोटार सायकल त्या ठिकाणी मिळुन आली नाही. त्यावेळी त्यांनी मोटार सायकलचा आजुबाजुच्या परिसरात शोध घेतला परंतु ती मिळून न आल्याने त्याबाबत अज्ञात आरोपीविरुध्द नवघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. नवघर पोलीस ठाणे हददीत वारंवार मोटार सायकल चोरीचे गुन्हे घडत असल्याने वरिष्ठांनी गुन्हे उघडकीस आणण्याबाबत सुचना दिल्या होत्या. त्या अनुषंगाने नवघर पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तपास करून आरोपी शुभम निरज सिंग (२५) , ओम विक्रम सोळंकी (१९ ) यांना ताब्यात घेवनु तपास केला असता त्यांनी गुन्हा केल्याचे उघडकीस आले. त्यांना या गुन्ह्यात अटक करून आरोपीकडे अधिक तपास केला असता त्यांनी चोरी केलेल्या ४ व गुन्हे करतांना वापरलेले १ अशा ५ मोटार सायकल ०१,५०,००० रुपये किमतीच्या जप्त करण्यात आल्या आहेत व त्यांनी इतर नवघर पोलीस ठाण्यात ३ व नायगाव पोलीस ठाण्यात १ असे ४ गुन्हे केल्याचे उघडकीस आले आहे.

Scanned with CamScanner

म. टा. ५. ५. १९.

# विरारमधून विदेशात लूट

## राजोडी येथील बोगस कॉल सेंटरप्रकरणी तपास सुरू; बनावट वेबसाइटचा वापर

**म. टा. वृत्तसेवा, वसई**

एका आंतरराष्ट्रीय बँकेतील ग्राहकांची माहिती मिळवून त्यांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या बोगस कॉल सेंटर उघड करण्यात अर्नाळा पोलिसांना नुकतेच यश आले आहे. कॉलसेंटरमध्ये काम करणाऱ्यांना ४९ जणांना पोलिसांनी अटक केली असून जास्त पगाराच्या नोकरीचे आमिष दाखवून त्यांना या कॉल सेंटरमध्ये काम करण्यास बोलावल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. आंतरराष्ट्रीय बँकेतील ग्राहकांना फसवण्यासाठी शिक्षण नव्हे, तर इंग्रजी भाषा येणे महत्त्वाचे असल्याचे या कर्मचाऱ्यांना सांगण्यात आले होते. विशेष म्हणजे, आंतरराष्ट्रीय ग्राहकांचे कॉल वळवण्यासाठी विशिष्ट अॅप्लिकेशन किंवा बनावट संकेतस्थळ सुरू करण्यात आल्याचा संशयही पोलिसांनी व्यक्त केला आहे.

अर्नाळा पोलिस ठाण्याच्या हद्दीत विरार, राजोडी समुद्रकिनारी ओएसी पेंट बॉल अरेना येथे रात्रीच्या वेळी परवानगीविना, बेकायदा कॉल सेंटर चालवले जात असल्याची माहिती अर्नाळा पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार रविवारी पहाटे ४ वाजता छापा टाकून, कॉल सेंटरमध्ये काम करणारे ३७ पुरुष व १० महिलांना पोलिसांनी ताब्यात घेतले. या कॉल सेंटरमार्फत पेपाल या ऑस्ट्रेलियास्थित बँकेतील ग्राहकांची लूट करण्यात येत असल्याचे पोलिस तपासात समोर आले. येथे काम करणाऱ्यांना कम्प्युटर, हेडफोन, इंटरनेट आदी आयटी साहित्य पुरवण्यात आले होते. कॉल सेंटरमध्ये येणारे ग्राहकांचे कॉल स्वीकारून, त्यांना पेपालचे अधिकृत कॉल सेंटर असल्याचे भासवत त्यांची गोपनीय माहिती जमा करायची आणि त्याआधारे त्यांची लूट करायची, अशी कार्यपद्धती वापरण्यात येत होती. त्यासाठी बनावट संकेतस्थळ किंवा अॅप्लिकेशन सुरू करण्यात आल्याचा संशय पोलिसांना आहे. याबाबत तपास सुरू असल्याचे अर्नाळा पोलिसांनी सांगितले.

कॉल सेंटर चालवणारा मुख्य आरोपी फरार आहे. कॉल सेंटरमधील कर्मचारी महाराष्ट्राबाहेरील असल्याचे तपासात उघडकीस आले. दिल्ली किंवा मुंबईतील मोठ्या कॉल सेंटरमध्ये बड्या पगाराची नोकरी देण्याचे आमिष त्यांना दाखवण्यात आले होते. महिन्याला १८ ते २० हजार रुपये मोबदला त्यांना देण्यात येत होता. आपण संबंधित बँकेच्या ग्राहकांची फसवणूक करत आहोत, हे माहिती असल्याशिवाय हे काम होणे शक्य नाही, त्यामुळे आपण चुकीचे काम करत आहोत, याची कल्पना या कॉल सेंटरमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना होती, अशी माहिती प्राथमिक तपासात समोर आल्याचे अर्नाळा पोलिसांनी सांगितले.



### आणखी बोगस कॉल सेंटर?

वसईत अशा प्रकारचे बनावट कॉल सेंटरचे रॅकेट उघडकीस आल्याने स्थानिकांना धक्का बसला आहे. बनावट कॉलद्वारे बँकांच्या ग्राहकांना लुटण्याचे प्रकार याआधीही समोर आले आहेत. वसईत आणखी बोगस कॉल सेंटर असण्याची शक्यता असून, मिरा-भाईंदर वसई-विरार पोलिस आयुक्तालयाने याबाबत सखोल तपास करावा, अशी मागणी वसईकरांनी केली आहे.

**“ कॉल सेंटरच्या माध्यमातून कशाप्रकारे लूट केली जात होती, याची प्राथमिक माहिती समोर आली आहेच. मात्र सखोल तपास सुरू आहे. मुख्य आरोपीचा शोधही सुरू आहे. ऑस्ट्रेलियातील बँकेच्या ग्राहकांना लुटण्याचे काम होत असल्याने याबाबत त्या देशातील पोलिसांना तसेच बँकेला माहिती देण्यात येणार आहे.**

– कल्याणराव कर्पे, वरिष्ठ पोलिस निरीक्षक, अर्नाळा पोलिस ठाणे

पुढारी पा-नं-७.

# मिरा-भाईंदरमधील १ हजार १०८ इमारती धोकादायक अवस्थेत

## केवळ ३६९ इमारतींचा स्ट्रक्चरल ऑडिट रिपोर्ट प्राप्त

**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**

मिरा-भाईंदर महापालिका आयुक्त दिलीप ढोले यांनी १० एप्रिल रोजी आयोजित आढावा बैठकीत शहरातील धोकादायक इमारतींचा सर्वे करून तात्काळ अहवाल सादर करण्याचे निर्देश सर्व प्रभाग अधिकाऱ्यांना दिले. त्यानुसार एकूण ६ प्रभाग समिती अंतर्गत ३० वर्षे पूर्ण झालेल्या १ हजार १०८ इमारतींना संभाव्य धोकादायक अवस्थेत असल्याचे गृहीत धरून स्ट्रक्चरल ऑडिट रिपोर्ट सादर करण्यासाठी नोटिसा पाठविल्या आहेत. यापैकी आत्तापर्यंत केवळ ३६९ इमारतींचाच स्ट्रक्चरल ऑडिट रिपोर्ट पालिकेला प्राप्त झाल्याचे निदर्शनास आले आहे.

शहरातील ३० वर्षे पूर्ण झालेल्या इमारतींची सक्षमता दरवर्षीच्या पावसाळ्यापूर्वी तपासली जाते. अशा इमारतींची सक्षमता तीन वर्गवारीत तपासली जाते. इमारत जर्जर झाल्यास ती धोकादायक ठरवून तात्काळ रिकामी केली जाते. इमारत दुरुस्तीयोग्य असल्यास पालिकेकडून दुरुस्तीची रितसर परवानगी घेऊन इमारतीची दुरुस्ती केली जाते. शेवटच्या वर्गवारीत इमारतीची किरकोळ दुरुस्ती करण्यासाठी पालिकेकडून परवानगी दिली जाते. पावसाळ्यात जर्जर झालेल्या इमारती कोसळून त्यात जिवीत तसेच वित्तहानी होण्याची शक्यता बळावत असल्याने अशा इमारती तात्काळ रिकाम्या करून जमीनदोस्त केल्या जातात. यंदाच्या पावसाळ्यापूर्वी देखील शहरातील धोकादायक इमारतींचा सर्वे करण्याचे निर्देश आयुक्तांनी सर्व प्रभाग अधिकाऱ्यांना १० एप्रिल रोजी आयोजित आढावा बैठकीत दिले होते. त्यानुसार प्रभाग निहाय झालेल्या सर्वेक्षणानुसार ३० वर्षे पूर्ण झालेल्या एकूण १ हजार १०८ इमारतींना स्ट्रक्चरल ऑडिट रिपोर्ट सादर करण्याच्या नोटिसा बजाविण्यात आल्या.

प्रभाग समिती १ कार्यालयांतर्गत ९४ इमारतींचा समावेश असून त्यापैकी ४४ इमारतींनी अहवाल सादर केला असून प्रभाग समिती २ अंतर्गत ३२६ इमारतींचा समावेश असून त्यापैकी ५२ इमारतींचा अहवाल प्राप्त झाला आहे. प्रभाग समिती ३ अंतर्गत ९४ इमारतींचा समावेश असून त्यापैकी ६१ इमारतींचा अहवाल प्राप्त झाला असून प्रभाग समिती ४ कार्यालयांतर्गत ११३ इमारतींचा समावेश असून त्यापैकी एकही इमारतीचा अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही.

पुढारी पु-५-३.

# स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांबाबत संभ्रम

**विरार : पुढारी वृत्तसेवा**

कोविड आणि नव्या सरकारचे ओबीसी आरक्षणाचे बदलते धोरण यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लांबणीवर पडल्या असून याला तीन वर्षे पूर्ण होतील. वसई-विरार महानगर पालिकेच्या निवडणुका लांबल्या असून या निवडणुका कधी लागतात याकडे सर्वच वसईकरांचे लक्ष लागून राहिले आहे. दरम्यान या निवडणूकाही ऑक्टोबरमध्ये होतील असेही बोलले जात असल्याने अनेक इच्छुक कार्यकर्ते निवडणुका कधी लागतात आणि आपण उमेदवारी दाखल करून विजयी होतो या प्रतीक्षेत आहेत.

केंद्रातील भाजप सरकार व राज्यातील शिंदे-फडणवीस सरकार आजही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तातडीने घेण्याच्या विचारात नाही. सत्ताधारी पक्षातील सूत्रानुसार येत्या ऑक्टोबरमध्ये पालिकेच्या निवडणुका होतील; मात्र सरकारची निवडणूक घाई आज तरी दिसत नाही.

भाजपाला मुंबई महापालिका जिंकायची असून शिवसेनेला कमजोर करण्याची त्यांची रणनिती सुरु आहे. वसईतही भाजपा किती जागा जिंकणार त्यासाठी त्यांची काय तयारी सुरु आहे याचा ठाव-ठिकाणा सध्या तरी नाही असेच चित्र आहे.

Scanned with CamScanner

पुण्यनगरी ५-५-१.

# मीरागाव येथे बेकायदेशीर वृक्षतोडप्रकरणी कंपनीवर गुन्हा

**मीरा रोड :** काशिमीरा पोलीस ठाणे हद्दीतील मीरागाव येथे एका कंपनीने बेकायदेशीर वृक्षतोडप्रकरणी मीरा-भाईंदर उद्यान विभागाने काशिमीरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. मीरागाव येथील एमआयडीसी मीरा, प्लॉट नं. ए-१२ येथील मे. सी. आर. इंटरप्रायजेस या जागेतील ४ ते ५ मोठी झाडे कापल्याची तक्रार मीरा-भाईंदर उद्यान विभागाचे उद्यान अधीक्षक नागेश विरकर यांच्याकडे करण्यात आली होती. त्या तक्रारीनुसार त्या ठिकाणी उद्यान विभागाकडून प्रत्यक्ष पाहणी केली असता, त्या जागेतील २ ताडांची झाडे, १ उंबराचे झाड जमिनीलगत कापलेले दिसून आले. तसेच अन्य २ झाडांची छाटणी करण्यात आल्याचे दिसून आले. त्या कंपनीला नोटीस दिली असता, कोणत्याही प्रकारचा खुलासा करण्यात आलेला नाही. त्यामुळे मे. सी. आर. इंटरप्रायजेस या कंपनीवर बेकायदेशीरपणे झाडे कापलेली असल्यामुळे त्यांच्या विरुद्ध काशिमीरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पुण्यनगरी ५-५-४

# उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पोलिसांचा सत्कार

**मीरा रोड :** मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील पोलीस ठाण्यामध्ये मार्च महिन्यामध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पोलीस अधिकारी, अंमलदार यांचा मासिक गुन्हे आढावा बैठकीत पोलीस आयुक्त मधुकर पांडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला आहे.

मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील प्रत्येक पोलीस ठाण्यामध्ये तपास करून गुन्हे उघडकीस आणणाऱ्या पोलीस अधिकारी, कर्मचारी यांचा आढावा बैठकीत सत्कार करण्यात येतो. अशाच प्रकारे मार्च महिन्यात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या गुन्हे शाखा कक्ष ०१ व मीरा रोड पोलीस ठाण्याचा प्रथम क्रमांक आहे. विरार पोलीस ठाणे, काशिमीरा पोलीस ठाणे, भरोसा सेलच्या तेजश्री शिंदे, तुळिंज पोलीस ठाणे, गुन्हे शाखा कक्ष ०२, गुन्हे शाखा कक्ष ०३ यांचा समावेश आहे. मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये मार्च महिन्यातील गुन्ह्यांची उत्कृष्ट उकल केल्याबद्दल प्रशस्तीपत्र व बक्षीस देऊन सत्कार करण्यात आला. आयुक्तालयाच्या हद्दीत १७ पोलीस ठाणी असून दररोज वेगवेगळे गुन्हे दाखल होत असतात. पोलीस त्यांच्या बुद्धी कौशल्याच्या बळावर गुन्हे उघडकीस आणतात. मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाकडून पोलीस कर्मचारी, अधिकारी यांच्या कामाची प्रशंसा केल्याने त्यांना पुढील काम करण्यास प्रेरणा, ऊर्जा मिळण्यासाठी उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्याचा मासिक गुन्हे आढावा बैठकीत सत्कार केला जातो.

Scanned with CamScanner

दैनिक

# मुंबई केसरी टाइम्स

R.N.I. NO MAHHIN.

एक साथ प्रकाशित, पालघर, ठाणे, मुंबई.

www.mumbaikesaritimes.com

वर्ष : १५ अंक : 304 बुधवार १२ एप्रिल २०२३ मूल्य 2 रुपए Post-Reg- No. PLG/249/2023/2025 पृष्ठ : 08



# सराहनीय कार्य पर पुलिस कमिश्नर के हाथों पुलिस अधिकारियों को प्रशस्ति-पत्र

**वसई** ; मार्च २०२३ में उत्कृष्ट प्रदर्शन करने वाले पुलिस अधिकारी व पुलिस कर्मचारियों को मीरा-भाईदर वसई विरार पुलिस आयुक्तालय के पुलिस कमिश्नर मधुकर पांडेय ने प्रशास्ति-पत्र व पुरस्कार देकर उन्हें सम्मानित कर उनका मनोबल काम के प्रति मनोबल बढ़ाया है। यह सम्मान पत्र मासिक अपराध समीक्षा बैठक में दिया गया है।यह जानकारी पुलिस अधिकारी ने मंगलवार को दी है। बताया गया है कि अपराध समीक्षा बैठक (११ अप्रैल ) में क्राइम ब्रांच यूनिट १ (पुलिस निरीक्षक ) अविराज कुराडे व (वरिष्ठ पुलिस निरीक्षक ) विजयसिंह बागल,विरार पुलिस स्टेशन (सीनियर पुलिस निरीक्षक ) राजेंद्र कांबले,काशिमिरा थाना (सीनियर पुलिस निरीक्षक ) संदीप कदम,भरोसा सेल (सहायक पुलिस निरीक्षक ) तेजश्री शिंदे,तुलिंज थाना (सीनियर पुलिस निरीक्षक ) शैलेन्द्र नगरकर,क्राइम ब्रांच ३ यूनिट (पुलिस निरीक्षक ) प्रमोद बडाख और क्राइम ब्रांच यूनिट २ (पुलिस निरीक्षक ) शाहूराज रनवरे को प्रशास्ति-पत्र व पुरस्कार देकर उनको गौरवान्वित किया। ज्ञात हो कि उक्त पुलिस अधिकारियों की उपस्थिति में पुलिस कर्मचारी यानी इनकी टीम द्वारा मार्च २०२३ में विभिन्न गंभीर अपराधों में अपराधियों को धर दबोच कर कई मामलों की गुत्थी सुलझाते हुए पुलिस महकमे का सिर गर्व से ऊचा किया था।



Scanned with CamScanner

मुंबई चौफेर

# महिला सक्षमीकरणासाठी जल्लोष नारीशक्ती कार्यक्रमाचे आयोजन

## महिलांसाठी हेल्पलाइन क्रमांक

भाईंदर - मीरा-भाईंदर महानगरपालिका व जल्लोष नारीशक्ती समिती यांच्या संयुक्त विद्यमानाने शहरातील महिलांसाठी रोजगार व महिलांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी 'जल्लोप नारीशक्तीचा २०२३ मीरा-भाईंदर' या कार्यक्रमाचे १५ व १६ एप्रिलला आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे आयोजक संदीप राणे व डॉ. दिनेश पाटील आहेत. शहरातील महिलांना सक्षम बनवण्यासाठी व महिला सुरक्षेसाठी या कार्यक्रमाच्या माध्यमातून प्रयत्न केला जाणार आहे. महिलांसाठी हेल्पलाइन क्रमांक देण्यात येणार आहे.

शहरातील महिलांना रोजगार उपलब्ध व्हावा व महिलांना त्यांच्या पायावर उभे राहून व्यवसाय करता यावा याकरिता कार्यक्रमाच्या ठिकाणी कर्ज देण्यासाठी बँकेचे कर्मचारी उपलब्ध असणार आहेत.

कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे यात कोणताही पक्षपात न करता शहरातील सर्व महिलांना एकत्रित आणण्यासाठी व समाजात एकोपा जपण्यासाठी सर्व पक्षाचे त्याचप्रमाणे बचतगट, गणेश मंडळ, नवरात्री मंडळ, सामाजिक संस्था यांना एकत्र आणत त्याच्या मंडळातील महिलांच्या कलागुणांना वाव देण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. यात निरनिराळ्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे, त्यात भव्य रांगोळी स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, ग्रुप डान्स व स्पॉट गेम, पाककला स्पर्धा, नऊवारी साडी, पोशाख स्पर्धा, मंगळागौर स्पर्धा, महिलांच्या गुणगौरव स्पर्धा अशा स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत. स्पर्धेत विजयी होणाऱ्या महिलांसाठी आकर्षक बक्षिसे देखील ठेवण्यात आली आहेत. त्यामध्ये दुचाकी ॲक्टिव्हा, फ्रीज, सोन्याची नथ व इतर वस्तूंचा देखील समावेश आहे.

Scanned with CamScanner

# पोलीस आयुक्तालयासाठी अधिक वाहनांची गरज

## पोलीस आयुक्तालयाकडे २८० वाहने, शासनाकडे वाहनांसाठी करणार प्रस्ताव

भाईंदर - मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाची स्थापना होऊन २ वर्षे पूर्ण झाली असून, आयुक्तालयाच्या हद्दीत एकूण १७ पोलीस ठाणे आहेत. गुन्हेगारी नियंत्रणासाठी व शहरात गस्त घालण्यासाठी शासनाच्या मार्फत पोलिसांना फक्त २८० वाहने देण्यात आली आहेत. यापैकी १०८ चारचाकी वाहने व १७२ दुचाकी वाहनांचा समावेश आहे. शासनातर्फे देण्यात आलेली वाहने अपुरी असून, आणखीन काही वाहनांची गरज असून त्याकरिता लवकरच शासनाकडे प्रस्ताव करण्यात येणार असल्याची माहिती मीरा-भाईंदर व वसई-विरार पोलीस उपायुक्त मुख्यालय प्रकाश गायकवाड यांनी दिली आहे.

शासनातर्फे पोलिसांना देण्यात आलेल्या २८० वाहनांपैकी प्रत्येक पोलीस ठाण्याला २ दुचाकी व २ चारचाकी देण्यात आल्या आहेत. त्याच बरोबर वरिष्ठ पोलीस अधिकारी यांना देखील वाहने देण्यात आली आहेत. नागरिकांच्या सुरक्षेकरिता सुरू करण्यात आलेल्या डायल ११२ व महिलांच्या सुरक्षेकरिता शहरात गस्त घालत फिरण्यासाठी निर्भया पथकाकरिता देखील वाहने देण्यात आली आहेत. मीरा-भाईंदर व वसई-विरार पोलीस आयुक्तालय नवीन असून, देखील इतक्या कमी वाहनांच्या संख्येत देखील सर्वात कमी वेळात मदतीकरिता पोहचणार आयुक्तालय म्हणून ओळख प्राप्त आहे. मात्र सध्यास्थित पोलीस आयुक्तालयाकडे असणारी वाहने बिघाडामुळे बंद असतात व वारंवार दुरुस्तीला पाठवावी लागतात. त्यामुळे काम करण्यास वाहन उपलब्ध नसल्याने अडथळा निर्माण होत असतो.

मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्त मधुकर पांडे यांनी पदभार स्वीकारल्यापासून गुन्हे कमी करण्याकरिता व महिलांच्या सुरक्षेसाठी अनेक प्रयत्न करत आहेत. आयुक्तालयात २,२५० पोलीस कर्मचारी कर्तव्यावर आहेत. पोलीस आयुक्तालयामार्फत नागरिकांच्या सेवेसाठी डायल ११२ ची सुरुवात करण्यात आली असून, त्याला नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. मदतीकरिता महिन्याभरात जवळपास ४० ते ४५ हजार फोन ११२ वर येत आहेत. फोन आल्यानंतर लगेच मदत भेटावी याकरिता पोलिसांनी काही ठराविक अंतरावर बिट मार्शलची सोय केली आहे. यामुळे मदतीकरिता पोलीस २ मिनिटे ५८ सेकंदांत पोहचतात. मागील महिन्यात रिस्पॉन्स टाइम हा ३ मिनिटे २८ सेकंद होता. डायल ११२ साठी एकूण ५० दुचाकी वाहने व २८ चारचाकी देण्यात आल्या आहेत. डायल ११२ करता आवश्यक असलेली वाहने उपलब्ध असल्याने कमीत कमी वेळात ११२ वर फोन आलेल्या ठिकाणी पोहचण्यास मदत होत असल्याची माहिती आयुक्तालयामार्फत देण्यात आली आहे. पोलीस आयुक्तालयात वाहने कमी असली तरी मोठ्या प्रमाणात गुन्हे उघडकीस आणले जातात. उत्कृष्टरित्या गस्त घालून शहरात कोणतेही अनुचित प्रकार घडू दिले जात नाहीत. मात्र शासनातर्फे जर अजून वाहने मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या ताफ्यात दाखल झाली, तर आणखी चांगल्यारितीने काम करता येऊ शकते.

Scanned with CamScanner

# मोटरसायकल चोराना अटक : चार गुन्हे उघडकीस

**भाईंदर :** भाईंदरच्या नवघर भागातील मोटारसायकल चोरीचा तपास करत असताना अटक केलेल्या दोन आरोपीकडून चार गुन्हे उघडकीस आले आहेत.

भाईंदर पूर्वेकडील नवघर भागात जेसल पार्क येथे राहणाऱ्या शामलाल गुप्ता यांची होंडा मोटार सायकल चोरीला गेल्याची तक्रार दाखल झाल्याचा तपास करताना गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुप्त बातमीदारा व तांत्रिक विश्लेषणाव्दारे प्राप्त माहितीच्या आधारे शुभम निरज सिंग, वय- २५ वर्षे, याला दहिसर येथून तर ओम विक्रम सोळंकी, वय- १९ वर्षे, याला भाईंदर येथून ताब्यात घेवनु तपास केला असता त्यांनी नमुद गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना अटक करण्यात आले. आरोपीतांकडे अधिक तपास केला असता त्यांनी चोरी केलेल्या ४ व गुन्हे करतांना वापरलेले एक अशा ५ मोटार सायकल हस्तगत करण्यात आल्या आहेत.

Scanned with CamScanner

मुंबई चौफेर

# मोटारसायकल चोरी करणाऱ्या आरोपीला अटक

भाईंदर - नवघर पोलीस ठाण्याच्या हद्दीत वारंवार मोटारसायकल चोरीचे गुन्हे घडत असल्याने वरिष्ठांनी गुन्हे उघडकीस आणण्याबाबत सूचना व मार्गदर्शन केले होते. त्या अनुषंगाने नवघर पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुप्त बातमीदार व तांत्रिक विश्लेषणाद्वारे प्राप्त माहितीच्या आधारे मोटारसायकल चोरी करणाऱ्या दोन जणांना अटक करत त्यांच्याकडून १,५०,०००/- रुपये किमतीच्या ५ मोटारसायकल हस्तगत करत व ४ गुन्हे उघडकीस आणले आहेत. सदरची कामगिरी जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ -१, डॉ. शशीकांत भोसले, सहाय्यक पोलीस आयुक्त, नवघर विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली नवघर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय पवार, पोनि सुशिलकुमार शिंदे, सपोनि योगेश काळे, पोउपनि अभिजित लांडे, पोलीस हवालदार भुषण पाटील, सुरेश चव्हाण, नवनाथ घुगे, जयप्रकाश जाधव, पो. अंम. ओंकार यादव, सुरजसिंग घुनावत, विनोद जाधव यांनी केली आहे.

Scanned with CamScanner